फक्त शासकीय उपयोगासाठी

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी नेतृत्व

व

त्याचा विकासात सहभाग

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स् गार्डन, पुणे ४११ ००१.

१९९०

प्रस्तावना

राष्ट्राची, राज्याची, विभागाची व विशेषत: समाजाची प्रगती ही बहुतांशी तेथील नेतृत्वावर अवलंबून असते. जितके नेतृत्व चांगले, तितका त्या भागाचा उत्कर्ष गतिमान होतो. नेतृत्वाला प्रगतीच्या टप्प्यात फार मोठे स्थान आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील सद्य आदिवासी नेतृत्वाची स्थिती कशी आहे त्यांचा अभ्यास करावा असे या संस्थेला वाटले. त्या दृष्टीने "महाराष्ट्रातील आदिवासी नेतृत्व व त्याचा विकासात सहभाग " हा विषय या संस्थेने अभ्यासण्यासाठी निवडला.

या अभ्यासात मुख्यत्वे आदिवासींचे विविध स्तरावर सद्य नेतृत्व कसे आहे व त्याचा आदिवासी विकासात सहभाग कसा आहे हे पहाण्यात आले. यासाठी काही ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदा निवडून त्यांचा अभ्यास करण्यात आला. तसेच तेथील आदिवासी नेत्यांच्या भेटी घेण्यात आल्या. त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थीती बाबत त्यांची वैयक्तिक माहिती घेण्यात आली. त्याचप्रमाणे नवीन नेतृत्व कसे आहे, ते भरभक्कम कसे करता येईल याचाही पहाणीत विचार करण्यात आला. विकासात्मक कार्यक्रमात आदिवासी नेत्यांचा अधिक सहभाग कसा मिळविता येईल त्यावर तेथे प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या पहाणीत मिळालेल्या माहीतीच्या आधारावर हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

सदर अभ्यासाचे काम श्री. दि. स. महाजन, सांख्यिकी अधिकारी, यांनी, श्री. मो. भा. तुराणा, उपसंचालक ह्यांचे देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली पुर्ण केले. आदिवासी भागाचे विकासाचे नियोजनासाठी

व आदिवासी भागात काम करणाऱ्या अधिकारी वर्गाला, या क्षेत्रातील संशोधकांना, स्थानिक कार्यकर्त्यांना हा अहवाल मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल अशी खात्री आहे.

[आर. एस. नेगी]
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

अनुक्रमणिका

अ.नं.	प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक पासुन	पृष्ठ क्रमांक पर्यंत
१.	प्रकरण – १	महाराष्ट्रातील आदिवासी नेतृत्वाची व विकासाची पार्श्वभुमी.	०१	०६
२.	२	मुल्यमापन पाहणीचा उद्देश व क्षेत्रीय निवड	०७	११
३.	३	आदिवासी कल्याणकारी योजना व आदिवासी नेतृत्वाचा सहभाग	१२	२०
४.	४	क्षेत्रीय पाहणीत आढळलेले दृश्य	२१	४०
५.	५	पाहणीतील महत्वाचे निष्कर्ष	४१	४४
६.	६	आदिवासी नेतृत्वाची काही अभ्यासात्मक उदाहरणे.	४५	५२
७.	७	निरीक्षणावर आधारित शिफारशी.	५३	५६
८.	परिशिष्ट क्रमांक – १	माहिती संकलित केलेल्या पत्रकाचा नमुना	५७	६२

प्रकरण क्र. [१]

महाराष्ट्रातील आदिवासी नेतृत्वाची व विकासाची पार्श्वभूमी

प्रास्ताविक

१.१ आदिवासी नेतृत्वाचा इतिहास आपण अभ्यासला असता हे नेतृत्व फार पुरातन व उत्कृष्ट असल्याची अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. विशेषत: आदिवासींमधील पारंपारिक पंचायती हे एक आदिवासी नेतृत्वाचे चांगले उदाहरण आहे. आदिवासींचे सामाजिक व न्यायालयीन प्रश्न ते आपल्या पंचायती मार्फत सोडवून घेतात. अशा पंचायतींना आदिवासी जमातीकडूनही चांगला प्रतिसाद मिळतो. ह्या पारंपारिक पंचायती आदिवासींनायोग्य न्याय देऊन त्यांचा प्रश्न तेथल्या तेथे व जलद गतीने सोडविण्यासाठी फार मोठे कार्य करीत आहेत. ही प्रथा समाज रचनेच्या दृष्टीने बहुमोलाची आहे. अशी प्रथा इतर राष्ट्रात फार आदर्श समजली जाते.

१.२ आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले, अति दुर्गम भागात रस्ते, दळण-वळणाच्या सोयी झाल्यामुळे या समाजाचा इतर समाजा बरोबर संपर्क वाढला आणि त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या समाज रचनेत व नेतृत्व पध्दतीत बदल घडून आला.

१.३ भारताच्या घटनेमध्ये लोकशाही तत्वानुसार स्वायत्त संस्थांना अधिकार देण्यात आले व त्याप्रमाणे आदिवासी नेतृत्वात बदल होत गेला. जुन्या पारंपारिक पंचायतीचे स्थान नव्या ग्राम पंचायतींना मिळाले व जुन्या नेतृत्वात बदल झाला.

१.४ पारंपारिक पंचायतीमध्ये काही जमातीत नेते निवडण्याची पध्दत खालीलप्रमाणे होती.

अ] जमातीतील सर्व लोकांची ग्रामसभा घेण्यात येत असे. अशा ग्रामसभेत गावासाठी योग्य वाटणा-या नेत्यांची निवड करण्यात येत असे.

ब] काही घराण्यांकडे वंशपरंपरागत नेतृत्व चालू ठेवण्यात येत असे व हे जमातीस मान्य असे.

१.५ भारताच्या घटनेत लोकांनी लोकांसाठी नेते निवडावे असे नमूद केलेले असल्यामुळे या वरील पारंपारिक पंचायतीच्या नेते निवडीच्या पध्दतीत बदल झाला. पारंपारिक पंचायतीचे काम ग्राम पंचायतीकडे हळूहळू वर्ग होवू लागले. पारंपारिक पंचायतीचे महत्व कमी होऊ लागले. ग्राम पंचायतीला विकेंद्रीकरणामध्ये शासनाने महत्वाचे स्थान दिले. ग्राम पंचायतीत नेत्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यात येते.

ग्राम पंचायतीच्या नेत्यांची निवड ४ वर्षासाठी केली जाते. ही निवड मतदान पध्दतीने होते. ज्या उमेदवाराला जास्त मते मिळतील त्याची निवड ग्राम पंचायत सभासद म्हणून केली जाते.

या निवडलेल्या सभासदांमधून सरपंच व उपसरपंचांची निवड होते. सरपंच, उपसरपंच व सभासद मिळून गाव पातळीवरील : कारभार पहातात. गाव पातळीवरील सध्य नेतृत्व असे वरीलप्रमाणे आहे. अशाच प्रकारे नेतृत्व तालुका पातळीवर, पंचायत समितीमध्ये, जिल्हा स्तरावर, जिल्हा परिषदांमध्ये, राज्य स्तरावर विधान सभेमध्ये व राष्ट्र पातळीवर लोकसभेत नेतृत्व केले जाते. लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी

जमातीसाठी प्रत्येक स्तरांवर त्याचे प्रतिनिधित्व येण्यासाठी आदिवासींच्या जागा आरक्षित केल्या आहेत.

१.६ राष्ट्रपिता महात्मा गांधींचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी व ग्रामीण भागाचा सामाजिक व आर्थिक विकास घडविण्यासाठी सन १९५२ पासून सामाजिक विकास समूह योजना व राष्ट्रीय विस्तार योजना लागू करण्यात आल्यात. या योजनांमुळे आदिवासी समाजापर्यंत फारसा फायदा पोहचत नसल्याचे अनुभवांती आढळून आले आहे. त्यांना या योजनेंचा फायदा मिळण्यासाठी स्वतंत्र असे आदिवासी विकास गट सुरू करण्यात आले व त्याद्वारे आदिवासींचा सामाजिक व आर्थिक विकास घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतू अशा आदिवासी विकास गटामार्फत ही आदिवासींची प्रगती फारशी होऊ शकली नाही. यासंबंधी विविध कारणे शोधून काढल्यानंतर असे आढळून आले आहे की शासन ज्या योजना राबवित आहे त्यात आदिवासींचा सहभाग फारच अल्प आहे आणि त्यामुळे आदिवासींसाठी राबविलेल्या योजना संपूर्णत: यशस्वी होत नाहीत. असे निदर्शनास आल्याने दुरवरचा विचार करून व लांब पल्ल्याच्या योजना राबविण्यासाठी आदिवासी विकास गटाचे क्षेत्र फारच लहान पडत होते व सर्वसाधारण विकासाच्या कार्यक्रमातून आर्थिक दृष्टया दुर्बल असलेल्या घटकांकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे मध्यवर्ती शासनाने आदिवासी उपयोजना क्षेत्राची नवी संकल्पना सन १९७६ सालापासून महाराष्ट्रात

अंमलात आणली व त्यामुळे आदिवासींसाठी तयार करण्यात आलेल्या योजनांमध्ये आदिवासींना सहभाग असणे जरूरीचे भासू लागले. हा सहभाग आदिवासी नेतृत्वामार्फत मिळवावा असे शासनाकडून वारंवार सुचविण्यात आले.

१.७ भारताच्या घटनेमध्ये दुर्बल घटकांच्या विकासाची जबाबदारी ही शासनावर असल्याचे नमूद केले आहे. त्या दृष्टीने शासनाने आदिवासींच्या विकासाची जबाबदारी स्विकारलेली असून त्यांचा जलद गतीने विकास कसा करता येईल यासंबंधीचे प्रयत्न सध्या चालू आहेत. हे प्रयोग करीत असतांना आदिवासी नेत्यांना वेगवेगळया स्तरांवर सहभाग मिळविण्याच्या दृष्टीने त्यांची स्थाने निश्चित करण्याचे ठरविले व त्यासाठी लोकसभा, विधानसभा यासाठी त्यांच्या जागा राखून ठेवण्यात आल्या व त्या राखीव जागांद्वारे त्यांचे प्रतिनिधीत्व निर्माण करण्यात आले.

महाराष्ट्रात १-५-१९६२ पासून स्वायत्त संस्था सुरू करण्यात आल्या. त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचा समावेश आहे. ग्रामीण भागीतील ग्राम पंचायती हया पंचायत समिती व जिल्हा परिषदांशी संलग्न करण्यात आल्या. आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यामध्ये प्रतिनिधीत्व राखून ठेवण्यात आले व हे प्रतिनिधीत्व ठेवल्यामुळे आदिवासी नेतृत्वाला सहभागाचा वाव मिळाला. ग्रामपंचायत स्तरावर गावाच्या योजना

तयार करण्याचे काम तेथील स्थानिक नेतृत्वाकडे सोपविण्यात आले. त्यांच्या प्रतिनिधीत्वाचा हिस्सा तालुका व जिल्हा स्तरावर देण्यात आला. तालुक्याच्या व जिल्हयाच्या योजना तयार करतांना व मंजूर करताना अशा प्रतिनिधीत्वाचा सहभाग घेण्यात आला. अप्रत्यक्षरित्या आदिवासी नेतृत्वाच्या सहभागाचा महाराष्ट्रात चांगलाच वाव मिळाला परंतु हे नेतृत्व इतकेसे सबळ नसल्यामुळे त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी ते फारसे पेलू शकले नाहीत व त्यामुळे त्यांचा विकासात जो सहभाग पाहिजे होता तितका तो मिळू शकला नाही व त्यामुळे विकासात त्यांची आवश्यक गती प्राप्त होऊ शकली नाही. महाराष्ट्र राज्यात १९८१ च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ६२७.८४ लाख होती. त्यात आदिवासी लोकसंख्येच्या
५७.५८ लाख असून ती एकूण लोकसंख्येच्या
शेकडा ९.१९ टक्के आहे. महाराष्ट्र. राज्यात ४८ लोकसभेच्या जागा असून त्यापैकी ४ जागा या अनूसूचित जमातीसाठी आरक्षित करण्यात आलेल्या आहेत आणि त्यामुळे महाराष्ट्रातील कमीत कमी ४ खासदारांचे प्रतिनिधीत्व लोकसभेत दिसून येते. विधानसभेत २८९ जागा असून २३ जागा आदिवासींसाठी आरक्षित केलेल्या आहेत. ते विधानसभेत आदिवासींचे प्रतिनिधीत्व करतात. या जागा १९७१ च्या जनगणनेवर आधारित असून त्या १९८१ च्या जनगणनेतील वाढीव आदिवासी लोकसंख्येवर आधारित नाहीत. अशा रितीने देश पातळीवर, राज्य पातळीवर जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवर आदिवासी नेतृत्वाचा सहभाग घेण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील एकूण २९ जिल्हा परिषदा असून २९८ पंचायत समितीत व जिल्हा परिषदांमध्ये आदिवासींसाठी राखीव नेतृत्वही आपणास आढळते. अशा पध्दतीने ग्राम पातळीपासून ते राष्ट्र पातळीपर्यंत आदिवासी नेतृत्वाचा सहभाग मिळविण्यात आला आहे.

१.८ महाराष्ट्रातील आदिवासींचे सध नेतृत्व कसे आहे, त्याचा विकासावर कसा परिणाम होतो, आदिवासींचे प्रश्न कोणते, ते कसे त्यांचेकडून सोडविले जातात व त्यात आदिवासींचा सहभाग कसा मिळविला जातो, या बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न पुढील प्रकरणात केलेला आहे.

प्रकरण क्र. [२]

मूल्यमापन पाहणीचा उद्देश व क्षेत्रीय निवड

२.१ आदिवासी जमातींचा विकास घडवून आणणे ही सहज साध्य गोष्ट नसून ते एक आव्हानच आहे. असे आतापर्यंतच्या बहूविध प्रयोगांवरून दृष्टोत्पत्तीस आले आहे. आदिवासी क्षेत्र व आदिवासींच्या विकासाच्या बाबी अनेक गोष्टींशी निगडित आहेत. आदिवासींच्या संस्कृतीचे जतन करून त्यांचा विकास करावयाचा आहे. आदिवासी समाज सर्वसामान्य लोकवस्तींपासून दूर विशेष करून द-याखो-यात, डोंगराळ भागात, रानावनातून वस्ती करून राहिला आहे. त्यामुळे जरी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ग्रामीण विकासाच्या दृष्टीने फार मोठया प्रमाणावर प्रयत्न झालेले असले तरी आदिवासींची आर्थिक प्रगती तशी फारशी झालेली नाही. पंचवार्षिक योजनांद्वारे काही अंशी कृषी, दुग्धव्यवसाय शिक्षण व सिंचन हया सारख्या ग्रामीण विकासाशी निगडीत असलेल्या क्षेत्रात प्रगती झालेली असली तरी विकासाच्या प्रक्रियेत आदिवासी जनतेचा सक्रिय सहभाग फारसा आढळत नाही.

२.२ आदिवासी समाजामध्ये आतापर्यंत विकासाभिमुख खंबीर, हुषार व कष्टाळू नेतृत्व नसल्याने विकासाच्या योजनांपासून आदिवासी समाज वंचित राहिला आहे असे वर्तिले जाते. आदिवासी समाजामध्ये झालेल्या शिक्षणाच्या प्रसारामुळे त्यांच्यामध्ये आता जागृती निर्माण होऊ लागली आहे व त्यांचेमध्ये नवे नेतृत्व पुढे

येऊ लागले आहे. ते नेतृत्व कसे आहे, ते विकासाच्या प्रक्रीयेत सहभाग घेतात किंवा नाही इ. बाबी डोळ्यासमोर ठेवून हा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी खालील उद्दीष्टे ठरविण्यात आली .

२.३ मूल्यमापन अभ्यासाठी उद्दीष्टे :

[अ] आदिवासी समाजीतील पूर्वीच्या नेतृत्वाच्या जागी नवे नेतृत्व कसे तयार होत आहे ?

[ब] आदिवासी समाजीतील नवे नेतृत्व कोणत्या आर्थिक गटातून निर्माण झाले आहे ?

[क] आदिवासी नेत्यांचा आदिवासी कल्याण योजनांमध्ये सहभाग कसा आहे ?

[ड] आदिवासी कल्याण योजना राबविताना पारंपारिक जमातीचा उपयोग करून घेता येईल का?

[इ] बिगर आदिवासी, आदिवासींच्या कल्याणकारी योजना राबविताना सहकार्य करतात का ? त्याबाबत ते आस्था दाखवितात किंवा कसे ?

[ई] आदिवासी नेतृत्व बळकट करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल ?

या वरील सर्व बाबींचा या पाहणीत विचार करण्याचे ठरविले.

२.४ सर्वेक्षणासाठी क्षेत्र निवड :

आदिवासी नव नेतृत्व व त्याचा विकासात सहभाग ह्याची मूल्यमापन पाहणी करण्यासाठी महाराष्ट्रातील सहयाद्री विभाग व गोंडवन विभाग अशा दोन विभागांचा विचार करण्यात आला. प्रत्येक विभागातून दोन दोन जिल्हे निवडण्याचे ठरविले. जिल्हयांची निवड करताना आदिवासी लोकसंख्ये-

बरोबरच राजकीय दृष्टया सुधारलेल्या तसेच कमी जागृत असलेल्या जिल्हयांचाही विचार करण्यात आला.

२.५ त्याप्रमाणे खालील विभाग निहाय जिल्हयांची निवड करण्यात आली.

अ.क्र.	विभाग	निवडलेले जिल्हे
१.	सहयाद्री	ठाणे, धुळे
२.	गोंडवन	अमरावती, गडचिरोली

२.६ जिल्हयांची निवड झाल्यानंतर त्या निवडलेल्या जिल्हयातून पंचायत समितीची निवड करण्यात आली. प्रत्येक जिल्हयातून एकेक पंचायत समितीची निवड करण्यात आली. गडचिरोली जिल्हयाचे भौगोलिक दृष्टया दोन विभाग होतात त्यामुळे तेथून दोन पंचायत समित्या निवडल्या.

निवडलेल्या पंचायत समितीची नावे खालीलप्रमाणे आहेत :

अ.क्र.	विभाग	जिल्हा	पंचायत समिति
१.	सहयाद्री विभाग	[१] ठाणे [२] धुळे	[१] वाडा [२] साक्री
२.	गोंडवन विभाग	[१] अमरावती [२] गडचिरोली	[३] मोरशी [४] आरमोरी [५] इटापल्ली

२.७ पंचायत समित्यांची निवड केल्यानंतर प्रत्येक पंचायत समितीमधून दोन दोन ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. ग्रामपंचायतींची निवड करताना [१] मुख्य रस्त्यालगतच्या काही ग्रामपंचायती. [२] काही रस्त्यापासून थोड्या दूर अंतरावरील तर [३] काही अति दुर्गम भागातील पंचायतींची निवड करण्यात आली.

ह्या ग्रामपंचायतीची निवड पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी [पंचायत], व विस्तार अधिकारी[सांख्यिकी] यांच्या सल्ल्याने निवड करण्यात आली. निवडलेल्या ग्रामपंचायती खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	जिल्हा	पंचायत समिती	ग्रामपंचायत
१.	ठाणे	वाडा	१. तिडले
२.			२. कंभरी
२.	धुळे	साक्री	१. बोपखेल
			२. खटयाळ
३.	अमरावती	मोर्शी	१. गणेशपूर
			२. धानोरा
४.	गडचिरोली	१. आरमोरी	१. पिंपळगांव [हळवे]
			२. कसारी
		२. इटापल्ली	१. कसनूर
			२. गट्टी.

२.८ ग्रामपंचायतींची निवड केल्यानंतर त्या ग्रामपंचायतीच्या आदिवासी सदस्याकडून पत्रक नं. १ मध्ये माहिती गोळा केली गेली. त्याचप्रमाणे त्या

त्या भागातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्याकडूनही माहिती मिळविण्यात आली.

३.९ क्षेत्रीय पाहणी करण्यासाठी निवडलेल्या राजकीय नेत्यांची मते अजमावण्यासाठी व त्यांची आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र पत्रक तयार करण्यात आले. त्या पत्रकात नेत्यांची मुलाखत घेऊन माहिती संकलित केली गेली.

३.१० सर्वेक्षण पाहणीतील ६६ आदिवासी नेत्यांकडून मिळविलेल्या माहितीचे तक्तीकरण व पृथ: करण करण्यात आले. त्यातून निघालेल्या निष्कर्षाचा सांगोपांग विचार पुढील प्रकरणात करण्यात आला आहे.

प्रकरण क्र. [३]

- आदिवासी कल्याणकारी योजना व आदिवासी नेतृत्वाचा त्यातील सहभाग

आदिवासी जमातींचा विकास जलद गतीने व्हावा ह्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १-५-१९८३ पासून मंत्रालयात स्वतंत्र आदिवासी विकास खाते सुरु केले. त्याचप्रमाणे आदिवासींच्या योजना मंजूर करण्यासाठी, त्या राबविण्यासाठी व त्या योजनांवर देखरेख ठेवण्यासाठी शासनाने राज्य स्तरापासून तालुका स्तरापर्यंत आदिवासींचे प्रतिनिधीत्व असलेल्या निरनिराळ्या समित्या व मंडळे नियुक्त केलीत. त्यांच्या मार्फत आदिवासी नेत्यांचा विकास कार्यक्रमात सहभाग घेण्यात येतो. त्यापैकी काही महत्वाच्या समित्यांचा उल्लेख खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१] राज्यस्तरीय समित्या :

[अ] विधीमंडळ उपसमिती :

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच राज्यस्तरीय आदिवासींच्या योजना राबविण्यासाठी व आदिवासींच्या इतर विकासाच्या बाबींचा विचार करण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नियुक्त केली आहे.

[ब] आदिवासी सल्लागार मंडळ :

मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ह्या मंडळाची नियुक्ती केली आहे. ह्या मंडळामध्ये आदिवासी विकास खात्याचे मा. मंत्री महोदय उपाध्यक्ष व १५ निवडून आलेल्या आदिवासी आमदारांचा समावेश असतो. ह्या मंडळामार्फत

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाबतचे सर्व निर्णय विचार विनिमय करून घेतले जातात. त्याचप्रमाणे हे मंडळ आदिवासी जमातींच्या प्रश्नाबाबत, अडचणींबाबत विचार करून राज्य स्तरीय अंमल बजावणीच्या दृष्टीने शासकीय धोरण ठरवित असते.

[क] उच्च अधिकार समिती :

आदिवासी जमातींच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी ही समिती नियुक्त केली आहे. हया समितीवर आदिवासी विकास खात्याचे मा. मंत्री महोदय हे अध्यक्ष असतात व ५ निवडलेल्या आदिवासी आमदारांचा समावेश यात केलेला असतो. ही समिती आदिवासी जमातींच्या जाती, प्रमाणपत्रांबाबत धोरण ठरविते. त्याचप्रमाणे नामसदृश्यामुळे फायदा घेणाऱ्या बिगर आदिवासींच्या प्रयत्नांना आळा घालण्याबाबतचा निर्णय घेण्याचा हक्क हया समितीला देण्यात आलेला आहे.

[ड] नियामक मंडळ :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे ही संस्था जरी शासकीय असली तरी तिच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी, संशोधन कामात मार्गदर्शन करण्यासाठी व संस्थेची प्रगती योग्य दिशेने चालली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हया मंडळाची नियुक्ती केली आहे. हया मंडळामध्ये उच्च अधिकारी, खाते प्रमुख, आदिवासी आमदार, निरनिराळ्या विषयातील तज्ञ, समाजशास्त्रज्ञ व आदिवासी भागात

काम करणारे समाज सेवक ह्यांचा समावेश केला आहे.

२. जिल्हा स्तरीय : [अ] जिल्हा नियोजन व विकास मंडळ :

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विकास योजना राबविण्यासाठी आदिवासी लोकांचा सहभाग घ्यावा ह्या हेतुने जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अखत्यारीत उपयोजनेतील १४ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक विशेष कार्यकारी समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ह्या समितीचे अध्यक्ष जिल्ह्याचे पालकमंत्री असतात. ह्या समितीमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्ह्यातील सर्व निवडलेले आदिवासी खासदार, आमदार, अ विधान परिषद सदस्य, समाज कल्याण समितीचे सभापती, पंचायत समितीचे सभापती व जिल्ह्यातील दोन आदिवासी सदस्य ह्यांचा समावेश असतो.

[ब] जिल्हा परिषद समाज कल्याण समिती :

स्थानिक स्तरावरील समाज कल्याणकारी योजना द राबविण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा सहभाग घ्यावा ह्या विचाराने शासनाने जिल्हा परिषदेत ९ सदस्य असलेली समिती नियुक्त केली आहे. ह्यामध्ये ५ सदस्य अनुसूचित जाती व जमातीपैकी असतात व ह्या ५ सदस्यांमध्ये कमीत कमी २ आदिवासी सदस्य असतात. ह्या ९ सदस्यातून सभापतींची निवड केली जाते.

[क] टास्क फोर्स कमिटी :

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तालुक्यांकरिता ही कमिटी नियुक्त केली आहे. ह्या कमिटीचे तालुक्याचे मा. आमदार हे अध्यक्ष

SP 557978

असतात. हया कमिटीत तालुक्यातील सर्व आदिवासी जिल्हा परिषद सभासद, पंचायत समिती सभासद, विधान परिषद सदस्य हयांचा समावेश असतो. ही कमिटी ऑईल इंजिन व विद्युत पंप वाटप करण्यासाठी आदिवासी शेतक-यांची निवड करते.

अशा रितीने आदिवासी नेतृत्वाचा सहभाग नियोजनात अंमलबजावणीत व देखरेखीसाठी विविध स्तरावर करण्यात आला आहे.

आता आपण आदिवासीसाठी निरनिराळ्या कोणत्या योजना राबविल्या जातात ते पाहू या.

महाराष्ट्र शासन आदिवासींसाठी शेती, शिक्षण, पशुसंवर्धन, जलसिंचन विषयक योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रात एकाधिकार आधारभूत किंमत खरेदी योजना, खावटी कर्ज वाटप योजना, ऑईल इंजिन किंवा विद्युत पंपाच्या पुरवठयाच्या योजना अशा बहुविध योजना राबवित आहे. हया प्रत्येक योजनेत आदिवासी नेत्यांचा फार मोठा सहभाग आहे. हया प्रत्येक योजनेत त्यांचा सहभाग कसा आहे, हे खालील परिच्छेदात योजना निहाय देण्यात येत आहे.

शेती विकासाच्या योजना :

शेती या धंद्यावर प्रामुख्याने आदिवासी उपजिविका करीत असतात. त्यामुळे शेतीची प्रगती झाल्याशिवाय आदिवासींची आर्थिक प्रगती

होणार नाही हे शासनाने ओळखले. त्यासाठी शासनाने शेती विकासाच्या निरनिराळ्या योजना आखल्या. त्यामध्ये पूर्ण अनुदानित, काही ५० टक्के अनुदानित अशा योजनांचा समावेश आहे. या योजनेत सुधारित बी-बियाणे वाटप, रासायनिक खते वाटप, पिक संरक्षक औषधे वाटप याचा समावेश आहे. या शिवाय जमीन सुधारणे, विहीरी खोदणे विहीरीवर पंप, ऑईल इंजिन बसविणे, भाजीपाला व फलोद्यान सारख्या योजना राबविणे या सारख्या योजनांचा यात समावेश आहे.

त्यांच्या गावात या योजना राबविण्यासाठी आदिवासी नेते, पंचायत समिती शेतकी खाते इ. निरनिराळ्या खात्यांमार्फत व बँकेमार्फत आदिवासींना मदत देण्याचा प्रयत्न करीत असताना दिसतात. त्यासाठी आदिवासींना अर्ज करण्यासाठी लागणारे कागदपत्र आदिवासी नेत्यां-कडून ब-याचअंशी पुरविली जातात.

शिक्षण विषयक योजना :

शिक्षणांशिवाय समाजाची प्रगती होणार नाही याची जाणं आदिवासींना होवू लागली आहे. त्यामुळे ते त्यांची मुले शाळेत पाठवू लागली आहेत. त्यासाठी आदिवासी भागात आश्रमशाळा स्थापन करून आदिवासी मुलांच्या शाळेचा, राहण्याचा व खाण्याचा प्रश्न शासनाने सोडविला आहे. त्यामुळे आदिवासींची मुले शाळेत शिकत आहेत व ते आपली प्रगती करीत आहेत. इ. ७ वी नंतर व त्यापुढील

शिक्षणासाठी तालुका पातळीवर त्यांचेसाठी वसतीगृहे काढून मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली आहे.

शासनाने शासकीय आश्रमशाळा ज्याप्रमाणे काढल्या आहेत, त्याचप्रमाणे आदिवासी भागात आदिवासी नेत्यांनी खाजगी संस्था स्थापन करून शासनाच्या आर्थिक मदतीने आश्रमशाळा सुरु केल्या आहेत व आदिवासी मुलांच्या शिक्षणाची जास्तीत जास्त सोय करून आपला सहभाग दर्शविला आहे. आश्रमशाळेच्या दैनंदीन कामावर आदिवासी नेत्यांची देखरेख असते. शासकीय आश्रमशाळेत वसतीगृहात प्रवेश मिळवून देणे, ~~पालकांना~~ आदिवासी वसतीगृहात, प्रवेश मिळवून देणे, पालकांना आदिवासी कार्यालयात नेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे त्यांना शैक्षणिक सवलती मिळवून देणे इत्यादी कामे आदिवासी नेत्यांकडून केली जातात.

पशुसंवर्धनाच्या योजना :

महाराष्ट्रात शेतील पूरक धंदा म्हणजे दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन व वराहपालन. या पूरक धंदाच्या विकासासाठी आदिवासी क्षेत्रात शासनामार्फत संकरीत गाई, म्हशी, बक-या व कोंबडयांचे वाटप केले जाते.

या योजना राबविण्यात आदिवासी नेत्यांचा सहभाग फार मोठा आहे. ते आदिवासींना गाई, म्हशी, बक-या बँकामार्फत कर्जावर मिळवून देतात. त्यासाठी कर्ज प्रकरणे करण्यापासून ते जनावरे विकत घेण्यापर्यंत त्यांना काम करावे लागते.

<u>जलसिंचन विषयक योजना</u> :

शेती व्यवस्थापनेत पाणी पुरवठ्याला फार मोठे स्थान आहे ते नसले तर शेतीमधून फायदेशीर उत्पन्न मिळू शकणार नाही, याचा विचार करून शासनाने आदिवासी क्षेत्रात पाण्याची ज्या ठिकाणी उपलब्धता आहे तेथे मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प व लघुपाटबंधारे बांधले आहेत. त्यापासून आदिवासींच्या जमिनीला पाणी मिळू लागले आहे. काही ठिकाणी वसंत बंधारे, तलाव पाझर तलाव बांधून शेतीसाठी पाण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे :

परंतु असे असढळले आहे की आदिवासी शेतकरी या पाण्याचा फारसा वापर करीत नाही. त्यांच्यामध्ये या पाण्याचा उपयोग करून दुतोटा पिकाचे अगर नगदी पिकाचे उत्पन्न काढण्याची आवड निर्माण झालेली नाही. यास विविध कारणे असू शकतील. परंतु आदिवासी नेत्यांच्या सहभागाने व सहकार्याने ह्या बाबींमध्ये सुधारणा होत आहे. आदिवासी नेते या योजना स्वत: राबवितात. त्या पाण्याचा उपयोग करून त्यांनी फळोद्यान व भाजीपाला लागवड सुरु केली आहे.

त्यामुळे आदिवासींना पाण्याचे महत्व पटू लागले आहे. अशा पध्दतीने जल सिंचनाच्या योजनेत आदिवासी नेत्यांचा सहभाग दिसू लागला आहे.

आदिवासींच्या आर्थिक स्थिती सुधारण्याच्या योजना :

एकाधिकार आधारभूत/किंमत खरेदी योजना

आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन एकाधिकार खरेदी पध्दतीने खरेदी करण्याचे काम आदिवासी विकास महामंडळ करीत असते. हे शासनाचे मुख्य एजंट म्हणून काम करतात. त्यांनी उपयोजना क्षेत्रात खरेदी केंद्र उघडली आहेत तेथे आदिवासीं उत्पादित अनुसूचित धान्याची व गौण वनोत्पादनाची खरेदी केली जाते. आदिवासींच्या मालाला योग्य भाव देणे, त्यांना वेळेवर पैसे मिळवून देणे हया बाबींमध्ये आदिवासी नेत्यांचा फार मोठा सहभाग आहे.

ऑईल इंजिन विद्युत पुरवठा योजना :

आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून शासनामार्फत प्रगतीशील शेतक-यांना मोफत वीजपंप/ऑईल इंजिन देण्याची योजना सुरू केली आहे. ही योजना संचालक, आदिवासी विकास यांच्यामार्फत राबविण्यात येते.

गरजू व प्रगतीशील शेतक-यांची निवड करण्यासाठी तालुका पातळीवर टास्क फोर्स समितीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. संबंधित तालुक्याचे विधानसभा/विधान परिषदसदस्य, महाराष्ट्र वीज मंडळ व भूजल

स्था

सर्व्हेक्षण विभागाचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. लाभार्थींची निवड समिती कडून केली जाते.

या प्रक्रीयेत आदिवासी नेत्यांचा फार मोठा सहभाग असतो. अशिक्षित आदिवासींकडून अर्ज घेण्यापासून ते त्यांच्या शेतावर पंप बसविण्यापर्यंत त्यांना बरीच कामे करावी लागतात.

प्रकरण ४

क्षेत्रिय पाहणीत आढळलेले दृश्य

४.१

आदिवासी नेत्यांची सद्यस्थिती व त्यांच्या नेतृत्वाचा आदिवासींच्या कल्याणकारी योजनेमध्ये होणारा परिणाम व सहभाग याबाबतच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आदिवासी उपयोजना क्षेत्रात १४ जिल्हा परिषदा आहेत. व त्यात ७५ पंचायत समित्या व ३४१२ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. इतक्या मोठ्या संस्थांना भेटी देवून थोड्या कालावधीत सर्वेक्षण करणे हे कक्षेपलीकडील आहे. म्हणून या पाहणीसाठी आदिवासी जमातींची लोकसंख्या ज्या जिल्ह्यात जास्त आहे अशा चार जिल्हा परिषदांची निवड करण्यात आली . प्रत्येक जिल्हा परिषदेतील १ पंचायत समिती निवडून प्रत्येक पंचायत समितीतून २ ग्रामपंचायती अभ्यासासाठी निवडल्या. मात्र गडचिरोली जिल्ह्यातील जिल्ह्याची भौगोलीक परिस्थितीचा विचार करुन यातील २ पंचायत समितीतील ४ ग्रामपंचायती क्षेत्रिय पाहणीसाठी निवडल्या.

४.१.१ अशा रितीने ४ जिल्हा परिषदा, ५ पंचायत समित्या व १० ग्रामपंचायतींची क्षेत्रिय पाहणी करिता निवड करून त्यातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व इतर सामाजिक कार्यकर्त्यांची मुलाखतीसाठी निवड केली, त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन याबाबतच्या अभ्यासासाठी आवश्यक ती माहिती मिळविण्यात आली. माहिती मिळवून त्या माहितीचे आकडेवारीचे पृथ:करण करण्यात आले. ही माहिती विविध तक्त्यात खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. त्यातील निष्कर्षही नंतर देण्यात येत आहेत.

४.१ निवडलेल्या नेत्यांची पदानुसार व जिल्ह्यानिहाय संख्या

पदाचे नांव/जिल्हा	नेत्यांची पदानुरुप संख्या				
	ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण
१	२	३	४	५	६
१. आमदार	–	१	–	–	१
२. जिल्हा परिषद सभासद	१	१	२	–	४
३. पंचायत समिती सदस्य	२	१	२	–	५
४. ग्रामपंचायत सरपंच	२	२	२	२	८
५. ग्रामपंचायत उपसरपंच	२	२	२	२	८
६. ग्रामपंचायत सभासद	४	६	९	१७	३६
७. सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी	१	–	–	२	३
८. तरूण मंडळ व इतर	–	–	–	१	१
एकूण	१२	१३	१७	२४	६६

वरील तक्त्यावरून असे दिसते की, राज्यपातळी पासून ते ग्राम-पातळीपर्यन्त काम करणा-या सर्व आदिवासी नेत्यांच्या मुलाखती घेऊन त्यांचा या पाहणीत अंतर्भाव करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

गाव पातळीवरील नेत्यांचे प्रमाण सर्व सामान्यपणे जास्त असल्यामुळे, पहाणीत अशा नेत्यांना अधिक प्राधान्य देण्यात आले आहे.

४.२ पहाणीतील निवडलेल्या गावातील नेत्यांची जमाती निहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या नेत्यांची जमातीनिहाय संख्या

अ.न.	जमातीचे नांव	जमातीनिहाय व जिल्ह्यानिहाय निवडलेल्या नेत्यांची संख्या				
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण
१	२	३	४	५	६	७
१.	मल्हार कोळी	८	–	–	–	८
२.	ठाकूर	१	–	–	–	१
३.	वारली	३	–	–	–	३
४.	कोकणा	–	७	–	–	७
५.	मावची	–	५	–	–	५
६.	भिल	–	१	–	–	१
७.	गोंड	–	–	१७	१७	३४
८.	हलबी, हलबा	–	–	–	७	७
	एकूण	१२	१३	१७	२४	६६

ह्यापूर्वी आदिवासी जमीतीचे नेतृत्व हे बहुतांशी बिगर आदिवासी जमातीकडून पूर्वापार पध्दतीने केले जात असे. परंतु आता त्यात बराच बदल झाला आहे. आदिवासी जमातींना आपल्या हक्कांची जाणीव झाल्यामुळे त्यांच्यातूनच नेतृत्व निर्माण होत आहे. पाहणीत असेही आढळून आले आहे की, ज्या भागात, ज्या जमातीचे जास्त प्राबल्य आहे, अशा जमातीकडे, त्या जिल्ह्याचे नेतृत्व असलेले आढळले आहे.

४.३ निवडलेल्या नेत्यांच्या कुटुंबाचे आकारानुरूप वर्गीकरण

कुटुंबाचा लोकसंख्येनुरूप आकार	कुटुंबाच्या आकारानुसार जिल्हानिहाय निवडलेल्या नेत्यांची संख्या					
	ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण	आकारानुरूप टक्केवार टक्केवारी
१	२	३	४	५	६	७
१) १ ते ५	५	८	१२	९	३४	५१
२) ६ ते १०	५	३	५	७	२०	३०
३) ११ ते १५	२	२	–	७	११	१७
४) १६ पेक्षा जास्त	–	–	–	१	१	२
एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, सध नेतृत्व हे लहान आकारमान असलेल्या कुटुंबातून निर्माण झालेले दिसते. पूर्वीप्रमाणे आदिवासी कुटुंबाचा मोठा आकार राहिलेला नाही. पूर्वी एका कुटुंबात १५ किंवा १५ पेक्षा जास्त व्यक्ती आढळत होत्या. जेवढे कुटुंब मोठे तेवढा त्या कुटुंबातील व्यक्तींचा मान मोठा असे.

वरील तक्त्यावरुन असे आढळते की पूर्वीची ही परिस्थिती अगदीच बदलली आहे. लहान आकाराची कुटुंबं अस्तित्वात येऊ लागली आहेत व त्यातून आदिवासी नेतृत्व निर्माण होत आहे.

४.४ निवडलेल्या नेत्यांचे वयोगटानुरूप विभागणी

वयोगट वर्षात	निवडलेल्या नेत्यांची जिल्हानिहाय संख्या					नेत्यांची संबंधित वयोगटातील नेत्यांची टक्केवारी
	ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण	
१	२	३	४	५	६	७
१. २५ ते ४५	८	१०	१५	१९	५२	७८
२. ४६ ते ५५	३	३	२	५	१३	२१
३. ५६ पेक्षा जास्त	१	–	–	–	१	१
एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

महाराष्ट्रा राज्यात आदिवासींमधील जमात पंचायती ब-याच कार्यक्षम होत्या असे ऐकीवात आहे. ह्या जमात पंचायती मधील नेतृत्व बहुतेक वयोवृध्द व्यक्तिंकडे असे. परंतु स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण झाल्याने व नेते निवडण्याच्या पध्दतीत मुलबः बदल झाल्याने आता नेतृत्वात व त्यांच्या वयोगटात बराच फरक झालेला आढळतो. तरुण नेतृत्वाला बराच वाव मिळाला आहे. तरुण नेतृत्वाला संधी उपलब्ध झाली आहे. आणि त्यामुळे आदिवासी नेतृत्व हे तरुण पिढीकडे विशेषत: २५ वर्षे ते ४५ वर्षे वयोगटाकडे गेलेले आढळते. बरेचसे वयोवृध्द यात आता भाग घेताना दिसत नाहीत.

४.५ नेत्यांची ईयत्तावार गटानुसार वर्गवारी

शिक्षणाची वर्गवारी	ईयत्तावार गटानुसार जिल्हानिहाय नेत्यांची संख्या					एकूण नेत्यांची संबंधित गटातील नेत्यांची टक्केवारी
	ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण	
१	२	३	४	५	६	७
१. निरक्षर	–	१	६	९	१६	२४
२. १ ते४	६	७	६	८	२७	४१
३. ५ ते ७	४	४	३	४	१५	२३
४. ८ ते ११	२	१	२	२	७	११
५. १२ ईय.ते पेक्षा जास्त	–	–	–	१	१	१
एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

ह्या पहाणीत निवडलेल्या नेत्यांच्या साक्षरतेचा अभ्यास केला असता खालील बाबी निर्दशनास येतात.

आजच्या नेत्यांची शिक्षणाची पातळी निरक्षराहून ७ वी पर्यन्त पोहचलेली दिसते. जास्त नेतृत्व असलेला गट १ ते ४ ईयत्तेच्या दरम्यान आढळलेला आहे. सुशिक्षितांच्या हातात नेतृत्व जावे असा बहुतेक लोकांचा कल दिसतो.

४.६ मुख्य व्यवसायानुरूप निवडलेल्या नेत्यांचे वर्गीकरण

मुख्य व्यवसायाचे : नाव	जिल्हा	निवडलेल्या नेत्यांची मुख्य व्यवसायानुरूप संख्या				
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण
१		२	३	४	५	६
१. शेती		१२	१३	१७	२४	६६
२. शेतमजुरी		८	–	–	–	–
३. नोकरी		–	–	–	–	–
४. व्यापार		–	–	–	–	–
एकूणात		१२	१३	१७	२४	६६

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, निवडलेल्या सर्वच आदिवासी नेत्यांचा मुख्य व्यवसाय शेती दिसतो. त्यामुळे सर्व जिल्हयातून मुख्य शेती व्यवसाय करणारे नेतेपद पुढे आलेले आढळते. शेतमजूर, नोकरी व व्यापार करणारे आदिवासी शेती व्यवसाय करणा-यापेक्षा कमी असल्याने त्यांच्याकडे हे नेतृत्त्व गेलेले दिसत नाही.

४.७ या नेत्यांच्या दुय्यम व्यवसायाचा विचार केला असता असे आढळते की ६६ कुटुंबापैकी फक्त ९ कुटुंबे दुय्यम व्यवसाय करतात. दुय्यम व्यवसाय करणा-या कुटुंबाचे एकूण कुटुंबाशी शेकडा प्रमाण १४ टक्के आढळते. ८६ टक्के कुटुबांचा चरितार्थ शेतीवरच चालतो.

दुय्यम व्यवसाय करीत असलेल्या नेत्यांच्या कुटुंबाचे व्यवसायानुरूप वर्गीकरण खालीलप्रमाणे आढळले.

४.७ दुय्यम व्यवसायानुरुप निवडलेल्या नेत्यांच्या कुटुंबाच्या संख्येचे व्यवसायानुरुप जिल्हानिहाय वर्गीकरण

अ.क्र.	दुय्यम व्यवसाय जिल्हा	दुय्यम व्यवसाय असलेल्या कुटुंबाची संख्या				
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण
१	२	३	४	५	६	७
१	दुग्ध	१	–	–	–	१
२	व्यापार	–	२	–	–	२
३	नोकरी	२	–	–	–	२
४	इतर	३	१	–	–	४
	एकुण	६	३	–	–	९

वरील तक्त्यावरून असे आढळते की २ कुटुंबाचे दुय्यम व्यवसाय दुग्ध व्यवसाय व नोकरी असे दिसून आले. दुय्यम व्यवसाय करणा-या ९ कुटुंबापैकी ६ कुटुंबे ठाणे जिल्हयातीलच आहेत. मुंबई व्यापार पेठ ही ठाणे जिल्हयाच्या लगत असल्यामुळे त्यांना दुय्यम व्यवसाय उपलब्ध होऊ शकले.

४.८ आदिवासी नेत्यांची वार्षिक उत्पन्नाची माहितीही पाहणीत संकलित करण्यात आली होती. त्या माहितीचे उत्पन्नानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे –

४.८ वार्षिक उत्पन्नाच्या गटानुरुप नेत्यांच्या कुटुंबाच्या संख्येचे वर्गीकरण

अ.न.	वार्षिक उत्पन्न गट (रुपयांत)	कुटुंबाच्या संख्येचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण					उत्पन्न गटानुरुप एकूण कुटुंबाबरोबर टक्केवारी
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण कुटुंबे	
१	२	३	४	५	६	७	८
१.	१००० पर्यन्त	–	–	१	२	३	५
२.	रु. १००१ ते रु. ३६००	६	४	११	१८	३९	५९
३.	रु. ३६०१ ते रु. ४५००	३	१	३	४	११	१७
४.	रु. ४५०१ ते रु. १००००	२	७	१	–	१०	१५
५.	रु. १०००१पेक्षा जास्त	१	१	१	–	३	४
	एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, एकूण नेत्यांच्या कुटुंबापैकी ६४% कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३६००/– पर्यन्त आहे. ३२ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रु. ३६००/– ते रु. १००००/– पर्यन्त आहे. व राहिलेल्या फक्त ४ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रु. १००००/–च्या वरील आहे. सर्वसाधारण बहुसंख्य आदिवासी नेत्यांचे उत्पन्न रु. १००१/– ते रु. ३६००/– च्या दरम्यान आहे.

४.९ सध आदिवासी नेत्यांना किती वर्षाचा नेतृत्वाचा अनुभव आहे याचा पण या पाहणीत अभ्यास करण्यात आला आहे. हे नेतृत्व पूर्वापार आहे किंवा बदललेले आहे हे पण पहाण्यात आले. त्यावर आधारित सध आदिवासी नेत्यांची पदावरील कालावधीनुसार वर्गवारी खालील प्रमाणे आढळलेली आहे.

४.९ नेत्यांचा पदावरील कालावधीनुसार विभागणी

पदावरील कालावधीचा अनुभव (वर्षे)	नेत्यांची अनुभवानुसार संख्या					नेत्यांचे कालावधीनुसार एकूण नेत्यांशी टक्केवारी
	ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण	
	२	३	४	५	६	७
१. वर्षापेक्षा कमी	५	८	१२	१०	३५	५३
२. ते ५ वर्षे	३	०	५	१०	१८	२७
३. ते १० वर्षे	२	४	–	२	८	१२
४. १ ते १५ वर्षे	१	१	–	२	४	६
५. पेक्षा जास्त वर्षे१	–	–	–	–	१	२
एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

वरील तक्त्यावरून असे दिसते की, ८० टक्के नेत्यांना ५ वर्षापेक्षा कम[illegible]नुभव आहे. १२ टक्के नेत्यांना ६ ते १० वर्षापर्यन्ताचा अनुभव आहे. ११ [illegible] १५ वर्षापर्यन्त अनुभव असणारे नेते फक्त ६ टक्के आहे. २ टक्के आदिवासी नेत[illegible]T १६ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. वरील बाबींवरून असे निदर्शनास येते [illegible], सध्याचे आदिवासी नेतृत्व हे अपक्वच आहे.

४. आदिवासी नेतृत्व बळकट करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या प्रशिक्षणाची आ[illegible]कता आहे याबाबत नेत्यांची मते अजमवण्यात आली. नेत्यांनी सुच[illegible]त्या प्रशिक्षणाच्या प्रकारानुरुप त्यांची संख्या खालील तक्त्यात देण्यात येत [illegible]हे.

७.११ प्रशिक्षणाचा प्रकार सुचविणा-या नेत्यांची जिल्हानिहाय संख्या

अ.नं.	सुचविलेल्या प्रशिक्षणाचा प्रकार	प्रशिक्षणाचा प्रकार सुचविणा-या नेत्यांची संख्या					
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	ऐकूण संख्या	प्रकारानुरुप एकूण नेत्यांची टक्केवारी.
१	२	३	४	५	६	७	८
१.	समाजसेवा	५	११	१०	१०	३६	५४
२.	व्यक्ती विकास	४	२	७	९	२२	३३
३.	सभाधारिष्ट	२	-	-	५	७	११
४.	विचारांची देव देवाण घेवाण करण्यासाठी	१	-	-	-	१	२
५.	इतर प्रशिक्षण	-	-	-	-	-	-
	एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

नेत्यांच्या वैयक्तिक विकासाबाबत विचार केला असता त्यांना वेगवेगळया विषयाबाबत प्रशिक्षण देण्याची बरीच गरज आहे असे आढळले. ब-याचश्या नेत्यांना समाजसेवेची आवड असल्यामुळे त्यांना समाजसेवेबाबतचे प्रशिक्षण मिळावे असे सूचविलेले आहे. व्यक्ती विकासावरही त्यांनी भर दिला आहे. आदिवासी हे तळागाळातील व दुर्गम भागातील असल्यामुळे त्यांचा व्यक्तीविकास फारसा झालेला/दिसत नाही. नेतृत्वात व्यक्ती विकासाला बरेच महत्व आहे. त्यामुळे व्यक्ती विकासाबाबत त्यांना मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता आहे.

मागील तक्त्यात दिल्याप्रमाणे , पाहाणीत असे आढळले आहे की, आदिवासी नेतृत्व हे बहुतांशि १ ते ४ ईयत्ता पर्यन्त शिक्षण घेतलेल्या गटातील आहे. त्यामुळे नेत्यांना लोकांत कसे मिळावे ? सभेत कसे बोलावे ? लोकांचे प्रश्न कसे सोडवावेत ? लोकांना अडचणीत कशी मदत करावी ? हया बाबत मार्गदर्शनाची आवश्यकता व गरज आहे. म्हणून अशा बाबतचे प्रशिक्षण नेत्यांसाठी आयोजित केले पाहिजे.

४.११ भावी आदिवासी नेतृत्व भरभक्कम करण्यासाठी काय अुपाय योजना शासनाने करावी याबाबत या पाहणीत नेत्यांची मते अजमविण्यात आलीत. त्यांनी सुचविलेले उपाय खालील तक्त्यात देण्यात आले आहे.

४.१२ भावी आदिवासी नेतृत्व भक्कम करण्यासाठी नेत्यांकडून सुचविलेले उपाय

अ.नं.	सुचविलेले उपाय	सुचविलेल्या उपायानुरुप नेत्यांची संख्या					
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण	सूचविलेल्या उपायानुसार नेत्यांची टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८
१.	शिक्षणाचा प्रसार	१०	१	३	२	१६	२४
२.	स्थानिक सुशिक्षितांना रोजगार उपलब्ध करून देणे	२	८	११	२२	४३	६५
३.	मंडळे स्थापन करणे	–	३	३	–	६	९
४.	व्यक्ती विकासाच्या सोयी	–	१	–	–	१	२
५.	इतर	–	–	–	–	–	–
	एकूण	१२		१७	२४	६६	१००

भावी आदिवासी नेतृत्व भक्कम करण्यासाठी हा एक नियोजनातील महत्वाचा टप्पा आहे. ह्याबाबत सध आदिवासी नेतृत्वाचे विचार घेतले असता त्यांनी सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न सोडविण्याबाबत सूचना केली आहे. ब-याच सुशिक्षित तरूणांना आपल्या गावी रोजंदारी उपलब्ध होत नसल्याने दुसरीकडे रोजंदारीसाठी स्थलांतर करावे लागते. त्यामुळे सुशिक्षित नेतृत्वाला गावाला मुकावे लागते. हे सुशिक्षित नेतृत्व गावातच राहणे आदिवासी समाजाच्या प्रगतीच्या दृष्टिने फारच जरुरीचे आहे. त्यामुळे अशा आदिवासी सुशिक्षित रोजगाराला गावातच अधिक रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्धतेवर जोर देण्यात यावा अशा सुशिक्षित आदिवासी तरूणांना रोजगारासाठी किंवा स्वयंरोजगारासाठी ग्रामपंचायत , सहकारी संस्था ह्यामध्ये जास्तीत जास्त वाव दिला गेला पाहिजे. आदिवासींमध्ये स्वयंरोजगाराचे व्यवसाय करण्याची पध्दत फारच अल्प प्रमाणात दिसते. यासाठी त्यांच्या मध्ये ही आवड जास्तीत जास्त निर्माण करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे जरुरीचे आहे. त्यासाठी त्यांना ह्याबाबतचे प्रशिक्षण देता आले तर ते अधिक उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

थोडक्यात आदिवासी भावी नेतृत्व भक्कम करण्यासाठी आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार झपाट्याने करण्याची आजची गरज आहे याबाबतचा दुजोरा ब-याच अनुभवी नेत्यांनी प्रगटपणे केला आहे.

४.१२ हया पाहणीत आदिवासी नेत्यांची व आदिवासी विकास योजनां= बाबत प्रतिक्रिया आजमविण्याचा प्रयत्न करण्यात आला. आदिवासींसाठी विविध योजना राबविल्या जातात. त्यापैकी काही योजना अंशतः किंवा पूर्णतः अयशस्वी ठरतात. हया योजना पूर्णतः यशस्वी का होत नाहीत व त्याचा आदिवासींना फायदा का मिळत नाही हयाची कारणे आदिवासी नेत्यांकडून समजावून घेण्यात आली. त्यांच्या अपयशाच्या कारणांची मिमांसा खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

१३ आदिवासी नेत्यांच्या मते आदिवासी विकास योजनांच्या अपयशाची विविध कारणे.

अ.नं.	आदिवासी विकास योजना अपयशी होण्याची कारणे	कारणानुरूप मते प्रकट करणा-या नेत्यांची संख्या					कारणानुरूप मते प्रकट करणा-या नेत्यांची टक्केवारी
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण संख्या	
१	२	३	४	५	६	७	८
१.	अज्ञानामुळे	२	१	३	१	७	११
२.	योजनांची सर्वांगीण माहिती मिळत नाही म्हणून	४	१	२	१३	२०	३०
३.	अंमलबजावणी बरोबर होत नाही म्हणून	४	९	३	१	१७	२६
४.	दररोजच्या गरजा भागत नाहीत व आर्थिक कमकुवतीमुळे	२	२	३	१	८	१२
५.	ठराविक लोकच फायदा उचलतात त्यामुळे इतरांना फायदा मिळत नाही	-	-	६	८	१४	२१
	एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

वरील तक्त्यावरुन असे मुख्यत्वे निदर्शनास येते की, आदिवासींसाठी राबविण्यात येणा-या सर्वांगीण योजनांची माहिती थेट लाभधारकापर्यन्त पोहचत नाही. त्यामुळे त्या योजनांची अंमलबजावणी बरोबर होत नाही. या प्रमुख कारणांमुळे आदिवासींसाठी घेण्यात येणा-या योजना राबविण्यात फारसे यश मिळत नाही. यासाठी खालील सूचना करण्यात येत आहेत.

१) योजनांना प्रसिध्दी मिळण्याच्या दृष्टिने मोठ्या प्रमाणात जनसंपर्क साधण्यात यावा.

२) अंमलबजावणी अधिका-यांनी गावांना भेटी जास्त प्रमाणात दिल्या पाहिजेत. शासनाने ठरविलेल्या गावी रात्रीच्या मुक्कामांची संख्या ही काटेकोरपणे व ख-या अर्थाने पाळली गेली पाहिजे.

३) ब-याच योजनांचा फायदा हा ठराविक लोकांनाच मिळतो. ख-या गरजू आदिवासींना मिळत नाही. अंमलबजावणी करणा-या अधिका-यांनी ख-या गरजू आदिवासींची निवड करुन त्यांना लाभ देण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले पाहिजेत.

४) आदिवासींमधील अज्ञानता व आर्थिक कमकुवतपणा ही सुध्दा योजनांच्या अपयशाची कारणे आहेत. म्हणून आदिवासींची आर्थिक स्थिती भक्कम होण्याच्या दृष्टिने व त्यांच्यात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टिने सतत प्रयत्नांची जरुरी आहे.

४.१४ <u>अति दुर्गम भागात कल्याणकारी योजना न पोहोचण्याची कारणे</u>

अ.नं.	अतिदुर्गम भागात योजना न पोहोचण्याची कारणे	कारणे सांगणा-या नेत्यांची संख्या					कारणानुसार एकूण नेत्यांची टक्केवारी
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण नेत्यांची संख्या	
१	२	३	४	५	६	७	८
१.	रस्ते, दळणवळणाची गैरसोय	१	२	१	११	१५	६३
२.	शासकीय नोकरांच्या अकार्यक्षमतेमुळे	१	२	–	–	३	१२
३.	लोकांची योजनेंबाबत अनास्था	१	१	१	१	४	१६
४.	ठराविक लोक फायदा उचलतात म्हणून	–	१	१	–	२	९
	एकूण	३	६	३	१२	२४	१००

अतिदुर्गम भागात अद्यापही दळणवळणाची साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या भागाचा विकसित भागाशी फारसा संबंध ~~[illegible]~~ येत नाही. कर्मचारी वर्ग दळणवळणाच्या सोयी नसल्याने त्या ठिकाणी पोहचत नाही. आदिवासींमधील महत्वाचा दुर्गूण म्हणजे ते अल्पसंतोषी आहेत. त्यांना जे मिळेल त्यावर राहण्याची व जशी परिस्थिती असेल त्या परिस्थितीत राहण्याची / जगण्याची संवय लागली आहे. त्यांच्या या संवयीत अद्याप बदल झालेला नाही. वरील तिन्ही कारणांमुळे आदिवासींसाठी राबविण्यात येणा-या योजना अतिदुर्गम भागात पोहचत नाहीत. यासाठी अतिदुर्गम भागाचा

संबंध वाढविण्यासाठी आजची गरज त्या भागात दळणवळणाच्या सोयी अधिक अधिक वाढविण्याची आहे.

४.१५ तळागाळातील आदिवासींना योजनांचा लाभ देण्यासाठी नेत्यांनी सुचविलेल्या अडचणींचे वर्गीकरण

अ.क्र.	विकासातील अडचणींचा प्रकार.	अडचणी दर्शविणाऱ्या नेत्यांची संख्या					प्रकारानुरूप एकूण नेत्यांची टक्केवारी
		ठाणे	धुळे	अमरावती	गडचिरोली	एकूण	
१	२	३	४	५	६	७	८
१.	आदिवासींमधील अडाणीपणा, भित्रेपणा	३	३	१	१०	१७	६६
२.	ठराविक लोकांनाच मदत मिळणे	१	२	१	-	४	१६
३.	कागदपत्रांची अडचण	-	१	-	-	१	४
५.	योजना न समजणे	१	१	-	-	२	७
६.	अपुरे तारण	-	-	१	१	२	७
	एकूण	५	७	३	११	२६	१००

तळागाळातील आदिवासींना , नेत्यांमार्फत विकासाच्या योजना फारशा पोहचविल्या जात नाही. ह्या बाबतची कारणे विचारली असता त्यांनी खालील महत्वाची कारणे या बाबत दिली आहेत.

१) आदिवासी अडाणी व भित्र आहेत.

२) आदिवासी अल्पसंतुष्ट व प्रामाणिक असल्याने त्यांना स्वतःचा फायदा समजत नाही.

३) आदिवासींच्या योजना ठराविक लोकांपर्यन्तच पोहचतात. ठराविक लोकच त्यांचा लाभ मिळवतात. त्या गळागाळातील लोकांपर्यन्त पोहोचत नाहीत.

४) काही आदिवासींच्या बाबतीत कागदपत्राच्या पूर्ततेची अडचण पडते तर काहींच्या बाबतीत तारण अपुरे पडते.

४.१६ सध आदिवासी नेत्यांचा योजनांमध्ये सहभाग

अ.न.	सहभागाचा प्रकार	सहभागानुरुप नेत्यांची संख्या – ठाणे	सहभागानुरुप नेत्यांची संख्या – धुळे	सहभागानुरुप नेत्यांची संख्या – अमरावती	सहभागानुरुप नेत्यांची संख्या – गडचिरोली	सहभागानुरुप नेत्यांची संख्या – एकूण	सहभागाच्या प्रकारानुसार एकूण नेत्यांची टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८
१.	योजना राबविणे	९	५	१४	२१	४९	७४
२.	योजना पंचायत समितीकडून मंजूर करुन आणणे.	–	–	–	–	–	–
३.	कर्ज प्रकरणी अर्ज करणे	–	२	१	–	३	५
४.	नवीन योजनांची माहिती देणे	३	६	२	३	१४	२१
	एकूण	१२	१३	१७	२४	६६	१००

आदिवासींच्या साठी ज्या विविध योजना राबविल्या जातात त्या विविध टप्प्यात आदिवासी नेत्यांचा सहभाग कोणकोणत्या स्तरावर असतो. हयाबाबत विचारणा केली असता असे आढळले की, शेकडा ७४ टक्के आदिवासी नेते योजना राबविण्यात पुढाकार घेतात. नवीन योजना तयार करण्यात कर्ज प्रकरणी मदत करण्यात. नवीन योजनांची माहिती लोकांना देण्यात फारच थोडया नेत्यांचा सहभाग आढळतो.

प्रकरण ७ वे

पाहणीतील महत्त्वाचे निष्कर्ष

निवडलेल्या चार जिल्ह्यांच्या क्षेत्रिय पाहणीत मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले असता खालील बाबी दृष्टीत्पत्तीस येतात :-

५.१ सद्य नेत्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती

५.१.१ जमातीनिहाय आदिवासींमधील नेतृत्व. — पाहणीत असे आढळले आहे की, जिल्ह्यातील प्रमुख आदिवासी जमातीकडे आदिवासींचे नेतृत्व आहे.

५.१.२ नेत्यांच्या कुटुंबाचे आकारमान — सद्य नेत्यांची निवड सर्वसाधारण लहान आकारमानाच्या कुटुंबातून झालेली आढळते.

५.१.३ नेत्यांची शैक्षणिक पात्रता — पाहणीत असे आढळून आले आहे की, २४% नेते हे निरक्षर आहेत. ४१% नेते १ ते ४ इयत्तेपर्यन्त शिकलेले आहेत व ३५ % नेत्यांचे शिक्षण ५ वी च्या पुढे झालेले आहे. बहुतांशी नेत्यांचे शिक्षण इयत्ता ४ थी पर्यन्त झालेले आहे.

५.१.४ नेतृत्वाची आर्थिक परिस्थिती :- पाहणीवरुन असे दिसले की, निवडलेल्या नेत्यांमधील ६४% नेत्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३६०१/- पर्यन्त आहे. ३२% नेत्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३६०१ ते रु. १०००० पर्यन्त आहे. फक्त ४% नेत्यांचे वार्षिक उत्पन्न रु. १०००१ च्या पेक्षा जास्त आहे.

५.१.५ नेतृत्वाची वंशपरंपरागत पार्श्वभूमी — नेत्यांच्या नेतृत्वाच्या पार्श्वभूमीबाबत या पाहणीत असे आढळून आले आहे की, १५% नेत्यांना पूर्वीची राजकीय पार्श्वभूमी आहे. बाकीच्या राहिलेल्या ८५% नेत्यांना कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे.

५.१.६ नेत्यांच्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय

निवडलेल्या सर्व नेत्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती आढळलेला आहे. त्यामुळे शेती व्यवसाय असलेल्या कुटुंबातून सध नेतृत्व निर्माण झाले आहे असे स्पष्ट होते.

५.१.७ नेतृत्वाचा अनुभव

आदिवासी नेत्यांच्या अनुभवाची विचार केला असता ५३% आदिवासी नेत्यांना १ वर्षापेक्षा कमी नेतृत्वाचा अनुभव आहे, २७% आदिवासी नेत्यांना १ ते ५ वर्षापर्यन्तचा अनुभव आहे. जवळ जवळ ८०% आदिवासी नेत्यांना ५ वर्षापेक्षाही कमी नेतृत्वाचा अनुभव आहे. यावरून असे स्पष्ट होते की, सध आदिवासी नेतृत्व हे अपरिपक्व आहे.

५.१.८ नेतृत्वात बदल

निवडलेल्या नेत्यांमधील ७८% नेते हे २५ ते ४५ वर्षे वयोगटातील आहेत त्यामुळे असे स्पष्ट होते की, आदिवासी जमातीमध्ये नव तरुणांस नेतृत्व उदयोन्मुख होत आहे.

५.२ आदिवासी नेतृत्व भक्कम करण्यासाठी उपाय :-

५.२.१ साक्षरता प्रसार व रोजंदारी वाढ

आदिवासी नेतृत्व भक्कम करण्यासाठी त्यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविले पाहिजे व सुशिक्षित बेकारांसाठी स्वयंरोजगार किंवा अधिक रोजंदारी जास्तीत जास्त शासनाने उपलब्ध करून दिली पाहिजे.

५.२.२ आदिवासी पारंपारिक जमात पंचायत विकासात सह

पारंपारिक जमात पंचायती काही ठिकाणी अस्तित्वात असलेल्या आढळतात. या जमात पंचायती आदिवासींचे सामाजिक प्रश्न सोडवितांना

आढळतात. व त्याचे समाजावर वर्चस्व व वजनही चांगले असल्याचे दिसले. अशा पारंपारिक जमात पंचायतींचा आदिवासी विकासात सहभाग करून घेणे जरूरीचे आहे असे वाटते.

५.३ आदिवासी कल्याणकारी योजनेत नेत्यांचा सहभाग

या पाहणीत असे निदर्शनास आले आहे की, ७४% नेत्यांचा नवीन योजना राबवितांना सहभाग आढळतो, परंतु नवीन योजना तयार करण्यांत कर्ज प्रकरणी मदत करण्यास लोकांना योजनेची माहिती देण्यास फारच थोडया नेत्यांचा सहभाग असल्याचे आढळले.

५.४ योजनांच्या प्रचाराचा व प्रसिध्दीचा अभाव

आदिवासी नेत्यांची विकासाबाबत मते विचारात घेतली असता असे दिसले की, आदिवासी विकासाच्या योजना अयशस्वी ठरण्याचे प्रमुख कारण म्हणजे अशा योजनांच्या प्रचाराचा व प्रसिध्दीचा अभाव. ५०% नेत्यांनी असे प्रतिपादिले की, योजनेचे स्वरूप व त्याबाबत संपूर्ण माहिती आदिवासींना मिळत नाही. त्यामुळे योजना घेण्यात व राबविण्यात लोकांचा सहभाग आढळत नाही. हयाला मुख्यत: खालील गोष्टी कारणीभूत आहेत.

अ. आदिवासी जमात ही अत्यंत गरीब असल्याने रेडिओ अगर दूरध्वनीसंच या सारख्या

आदिवासी जमात ही अत्यंत गरीब असल्याने रेडिओ अगर दूरध्वनीसंच या सारख्या प्रचाराच्या माध्यमांच्या वस्तु विकत घेऊ शकत नाहीत. आदिवासी भागात वर्तमानपत्रे, माहिती पत्रके पोहचू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना योजनांची सर्वांगीण माहिती मिळत नाहीत. अशी माहिती मिळण्यासाठी खालील उपाययोजना शासनाने अमलांत आणावीत असे वाटते.

१) ग्रामपंचायती अथवा आश्रमशाळेमध्ये माहिती केंद्रे स्थापन करावीत. त्यांना प्रचाराची/ पुस्तके व इतर साहित्य शासनाने पुरवावित.

२) आदिवासी कल्याण योजना बाबत निरनिराळ्या फिल्म्स काढून त्या आदिवासी भागात दाखवाव्यात.

३) वेळोवेळी योजनांबाबत प्रसिध्दीसाठी प्रदर्शने भरवावीत. या प्रदर्शनातून योजनांबाबत माहिती द्यावी.

प्रकरण ६ वे

६.१ आदिवासी नेतृत्वाची काही अभ्यासात्मक उदाहरणे :-

६.१ १) श्री. पांडूरंग देसले हे मल्हार कोळी जमातीचे नेते आहेत. त्यांचे वय ६० वर्षे आहे. त्यांचे शिक्षण ७ वी पर्यन्त झालेले आहे. मुंबईला गिरणीमध्ये कामगार म्हणून त्यांनी काम केले. तेथे त्यांना नेतृत्वाचे प्रशिक्षण मिळाले. आदिवासी समाजाची सेवा करता यावी म्हणून त्यांनी मुंबईची नोकरी सोडली व आपल्या गावी शेतीचा व्यवसाय सुरु केला. ते ग्रामपंचायतीचे ३ वर्षे सरपंच होते. तालुका समन्वय समितीचे ५ वर्षे सदस्य होते व तालुका कॉंग्रेस कमिटीचे २ वर्षे सचिव होते.

६.१.२ आदिवासींची आर्थिक उन्नती व्हावी या हेतूने त्यांनी गावात खालील योजना राबविल्या आहेत.

१) आदिवासी सेवा सहकारी संस्था गावात स्थापन करून त्यामार्फत आदिवासींना निरनिराळ्या योजनेखाली कर्ज दिले.

२) दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करून त्या सहकारी संस्थे मार्फत आदिवासींना म्हशी विकत घेऊन दिल्या. त्यांचे दुध त्या सहकारी संस्थेमार्फत विकत घेऊन कर्जाची फेड करून घेतली.

३) आदिवासी विकास खात्यामार्फत ऑईल इंजिन व विजेचे पंप मंजूर करुन ते विहिरीवर बसवून दिले. त्यामुळे आदिवासींच्या बागायत क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली.

४) आदिवासी विकास खात्याकडून आदिवासी लोकांच्या घरांचे विद्युतीकरण करून घेतले.

५) गावांतून जाणा-या नदीवर पूल नसल्याने पावसाळ्यात वहातूक बंद राहते. म्हणून शासनाकडून त्या कामाची मंजूरी मिळवून आणली आहे व लवकरच त्याचे बांधकाम सुरु करणार आहे.

या व्यतिरिक्त आदिवासींना योजनांची माहिती देणे, त्याबाबतचे अर्ज भरुन देणे, बॅन्केकडून कर्ज प्रकरणे मंजूर करुन आणणे, पंचायत समिती, जिल्हा परिषदा कडून नवीन योजनांची माहिती मिळविली व तिचा गावात प्रसार व प्रचार करणे इत्यादी कामे त्यांचेकडून केली जातात.

त्यांनी नवीन नेतृत्वाबाबत व योजना अंमलबजावणीबाबत खालील मते दर्शित केली आहेत.

ग्रामपंचायतीमध्ये जुन्या सदस्यांच्या जागी नवीन तरुण सदस्य निवडून येत आहेत.

ग्रामपंचायतीच्या निवडणूका पूर्वीप्रमाणे बिनविरोध होत नाहीत. निवडणूकीत पूर्वी सारखे श्रीमंत व जमीनदारच निवडून येतात असे नाही तर गरीब व मध्यम वर्गातील शिकलेला, समाजसेवा करणारी सुध्दा निवडून येतो. पूर्वीच्या नेतृत्वात आता बदल झालेला आहे.

आदिवासी लोकांना कल्याणकारी योजनांची माहिती ग्रामपंचायत सरपंच व सदस्य देतात. त्यांना लागणारी मदत गटविकास अधिकारी व बँकेच्या अधिका-यांना भेटून मिळवून दिली जाते.

बिगर आदिवासी नेते पूर्वीप्रमाणेच आदिवासींपासून अलग रहात नाहीत. त्यांचे संबंध आदिवासींबरोबर फारच चांगले असल्याने आदिवासींच्या योजना राबवितांना ते मदत करतात. चर्चा करून योजनेतील दोष दाखवितांत व योजना यशस्वी होण्यासाठी मदत करतात.

६.१.३ आदिवासी नेतृत्व बळकट व मजबूत करण्यासाठी खालील उपाययोजना करावी असे त्यांचे मत आहे.

१) आदिवासी नेत्यांना आदिवासी कल्याणकारी योजनांची माहिती मिळावी.

२) आदिवासी सर्व जमातीसाठी एक नेतृत्व तयार करावे.

आदिवासी नेत्यांमधील बुजरेपणा घालवावा.

आदिवासी नेत्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करावा.

५) आदिवासी नेत्यांना गावात रोजगार उपलब्ध करून द्यावे.

६) गावात तरुण मंडळे, भजनी मंडळे, विकास मंडळे इत्यादि सारख्या संस्था स्थापन कराव्यात.

७) नेत्यांचा व्यक्ती विकास घडवावा.

६.१.५ आदिवासी कल्याणकारी योजना, अतिदुर्गम भागात का पोहचत नाहीत ह्याबाबतची त्यांची त्यांची मते खालीलप्रमाणे आहेत.

अतिदुर्गम भागात आदिवासी कल्याणकारी योजनांपैकी लहान लहान योजना, उदा. बी बियाणे, खते वाटप इ. योजना पोहचल्या आहेत. परंतु ऑईल इंजिन, कर्जवाटप सारख्या मोठ्या योजना पोहचल्या नाहीत. अतिदुर्गम भागात दळणवळणाची सोय नसल्याने योजनांची माहिती थेटपर्यन्त पोहचत नाही. व अंमलबजावणी अधिकारी त्या भागापर्यन्त पोहोचू शकत नाही.

अतिदुर्गम भागातील आदिवासी अज्ञानी व गरीब आहेत. नवीन योजना घेण्यास ते घाबरतात. आदिवासी भित्रा असल्याने कधीतरी आलेल्या शासकीय नोकरांपुढे जाण्याची त्याची हिंमत होत नाही.

अतिदुर्गम भागातील आदिवासींना इतर प्रगत समाजाशी संबंध कमी येतो. त्यांच्या गरजा कमी अस . त्यामुळे ते आपल्या गरजा पारंपारिक पध्दतीने भागवितात व आपले जीवन

जगतात. त्यामुळे कल्याणकारी यशोजनांचा फायदा ते घेत नाहीत.

६.१.६ तळागाळातील आदिवासी लोकांना कल्याणकारी योजनांचा फायदा होतो.का? या बाबत त्यांनी खालील मते प्रदर्शित केली आहेत. शासनाला अपेक्षित असलेल्या प्रमाणात तळागाळातील लोकांना फायदा झालेला नाही.
त्याची कारणे खालीलप्रमाणे असू शकतील.

१) आदिवासी जमातीतील ठराविक लोकच योजनांचा फायदा घेतात.

२) तळागाळातील लोक शासकीय अधिका-यां पर्यन्त पोहचू शकत नाहीत.

३) योजनांची फलश्रुती लक्ष - साध्यावर अवलंबून असल्याने लाभार्थी निवडतांना योग्य ती काळजी घेतली जात नाही.

६.१.७ आदिवासी कल्याणकारी योजना अयशस्वी होण्याची कारणे त्यांनी खालीलप्रमाणे दिली आहेत.

१) आदिवासी कल्याणकारी योजनांची सर्वांगीण माहिती सामान्य माणसापर्यन्त पोहचत नाही.

२) योजना घाईगर्दीने राबविल्या जातात. त्या वेळेवर पोहोचत नाहीत.

३) दैनंदिन गरजा भागत नसल्याने योजनातून मिळालेल्या वस्तू विकून गरजा भागविल्या जातात.

४) योजना गरजू लोकांपर्यन्तं पोहचत नाहीत.
ठराविक लोकच योजनांचा फायदा घेतात.

६.(२) श्री. चिंधा दोधू भिल हे भिल जमातीचे नेते आहेत. त्यांचे वय ५१ वर्षे आहे. त्यांचे शिक्षण ५वी पर्यन्त झालेले आहे. त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून समाजसेवा हा दुय्यम व्यवसाय आहे. आदिवासी समाजाची आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी यासाठी ते गेली २५ वर्षे कार्य करीत आहे.

ते सन १९७५ सालापासून निरनिराळ्या सोसायटयांवर व कमिटयांवर सदस्य म्हणून कार्य करीत आहेत. संजय निराधार योजना कमिटिवर ते १९८४ पासून सदस्य आहेत. मच्छीमार को. ऑपरेटिव्ह सोसायटी मध्ये व दुग्ध उत्पादन सोसायटीवर १९८९ पासून सदस्य आहेत. ते आदिवासींसाठी राखून ठेवलेल्या विधान सभेच्या जागेवर आमदार म्हणून निवडून आले होते व त्यांनी ५ वर्षे आदिवासींचे विधानसभेत प्रश्न सोडविले. आदिवासी समाजाच्या कोणत्याही प्रश्नात ते भाग घेऊन शासनाकडून जिल्हा परिषद, अगर पंचायत समितीकडून तो प्रश्न सोडवून घेतात. आदिवासींच्या कल्याणकारी योजनांची माहिती पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडून घेऊन आदिवासींना त्याचा फायदा कसा घेता येईल हे ते नेहमी पाहतात व लोकांना योजनांची माहिती देतात.

६.२.१ त्यांनी आतापर्यन्त आदिवासी समाजासाठी बरीच कामे केली आहेत. त्यातील प्रामुख्याने खाली कामांचा उल्लेख करता येईल.

१) आदिवासींच्या घरांचे विद्युतीकरण करणे.
२) गावात रस्ते तयार करणे.
३) गावात पाणी पुरवठा योजना मंजूर करणे.
४) मध्यम आकाराचा बंधारा बांधून आदिवासी लोकांच्या जमिनी बागायत क्षेत्राखाली आणणे.
५) गावात विद्युत पंप बसविणे.

६.२.२ आदिवासी नेतृत्वात बदल झाला आहे का? नवीन नेतृत्व कोणत्या आर्थिक गटातून आले आहे? याबाबत त्यांची मते विचारली असता त्यांनी खालील मते प्रदर्शित केली.

सध्या ग्रामपंचायतीमध्ये सर्व सदस्य तरुण आहेत. ते गरीब किंवा मध्यम परिस्थितीतील आहेत. पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायतीची बिनविरोध निवडणूक होत नाही. प्रत्येक सदस्याला निवडणूकीत निवडून यावे लागते.

६.२.३ आदिवासी नेतृत्व बळकट व मजबूत करण्यासाठी खालील उपाय योजावेत असे मत त्यांनी प्रदर्शित केले आहे.

आदिवासींना शिक्षणाचे महत्व पटवून धावे शिक्षणाचा प्रचार करून शिक्षण सक्तीचे करावे. शिक्षणात समाजसेवेचे शिक्षण घ्यावे. संघटना कशी बांधावी , लोकांचे प्रश्न कसे सोडवावे .

संस्था

लोकांना अडचणीत कशी मदत करावी हया बाबत शिक्षण देणे जरुरीचे आहे.

आदिवासी समाजाला दारूच्या व्यसनातून मुक्त केले पाहिजे. आदिवासी भागात नवीन नवीन उद्योगधंदे सुरु करून त्यांना गावात रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. म्हणजे आदिवासी तरुणांमध्ये उत्तम नेतृत्व तयार होईल व ते गावातच राहणारे असल्याने ते नेतृत्व बळकट राहील.

६.२.४ आदिवासी कल्याणकारी योजना अयशस्वी का होतात ? याबाबत त्यांची मते खालीलप्रमाणे आहेत.

१) आदिवासी समाजातील ठराविक पुढारलेले लोकच कल्याणकारी योजनेचा फायदा घेतात. त्यामुळे सर्व समाजाला फायदा मिळत नसल्याने या योजना अयशस्वी होतात.

२) योजना राबविल्यावर त्यावर देखरेख कोणाचीही नसते. त्यामुळे योजनेचा उपयोग होत नाही. त्यामुळे मिळालेली मदत/वस्तु अगर जनावरे विकून टाकली जातात.

३) योजनेचा प्रचार कमी पडत असल्याने गरजू लोकांना फायदा घेता येत नाही.

४) जनसंपर्क कमी असल्याने योग्य ते लाभार्थी निवडले जात नाहीत.

लाभार्थींची आवड, कुवत व परिस्थिती पाहून जना न दिल्याने योजना अर्धवट राबविल्या तात व अयशस्वी होतात.

प्रकरण ७ वे

निरीक्षणावर आधारित शिफारशी

७.१ आदिवासी नेतृत्वाचा अभ्यास केला असता असे आढळून आले आहे की, सध्याचे आदिवासी नेतृत्व दुर्बल व अपरिपक्व आहे त्यामुळे आदिवासी विकासाला ज्या प्रमाणात गती मिळावयास पाहिजे त्या प्रमाणात ती मिळालेली दिसत नाही. ह्या नेतृत्वात बराच बदल करुन भक्कम व सुशिक्षित नेतृत्व तयार करण्याची आजची गरज आहे. त्यासाठी खालील सूचना करण्यात येत आहे.

७.१.१ साक्षरतेचे प्रमाण वाढविणे :-

सुसंस्कृत व साक्षर नेतृत्व हे प्रगतिशील राष्ट्राला फार आवश्यक आहे. सध्या आदिवासी नेतृत्वात निरक्षर नेतृत्व जास्त प्रमाणात आढळले. त्यासाठी त्यांची शिक्षणाची पायरी उंचावणे अत्यावश्यक आहे, म्हणून आदिवासी मधील साक्षरतेचे प्रमाण वाढविणे जरुरीचे आहे. समाजात जसजसे साक्षरतेचे प्रमाण वाढेल तसतसे भक्कम नेतृत्व समाजाला लाभेल.

७.१.२ समाजसेवी तरुणांना प्रशिक्षण देणे :-

सुदृढ व सशक्त भावी नेतृत्व तयार करण्यासाठी भावी पिढीतून त्यागी व समाजसेवी तरुणांना प्रशिक्षण देऊन त्यांना पुढे येण्याची संधी दिली पाहिजे. आश्रमशाळेतील मुलांपैकी ज्यांना ह्या बाबतची आवड आहे अशा तरुणांना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना पुढे आणले पाहिजे. अशा तरुणांसाठी आश्रमशाळेतून नेतृत्व व समाजसेवा असा विषय अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्याबाबत सुचवावेसे वाटते.

७.१.३ ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करणे :-

आदिवासी नेतृत्व हे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातून निर्माण होत आहे. त्यांची आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे त्यांना सामाजिक कार्यापेक्षा दैनंदिन गरजेच्या बाबींकडे अधिक लक्ष द्यावे लागते. त्यामुळे ग्रामीण पातळीवर जास्तीत जास्त रोजगार व शेतीला पुरक उद्योग धंदे उपलब्ध करून दिल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

७.१.४ सुशिक्षित तरूणांच्या गावातून स्थलांतरावर उपाय:-

आदिवासी समाजात सद्य सुशिक्षित/वर्ग उद्योग धंद्यासाठी व रोजंदारी निमित्ताने शहराकडे धाव घेत असल्याने उत्तम नेतृत्व तयार होण्यास आवश्यक असणारा घटक गावापासून दूर जात आहे. अशा सुशिक्षित तरूणांना गावातल्या गावात पुरक धंदे अगर नवीन रोजगार उपलब्ध करून दिला तर त्यांचे शहरी स्थलांतर थांबेल. हे शहरी स्थलांतर थांबविण्यासाठी सर्व पातळीवरून प्रयत्न झाले पाहिजेत.

७.१.५ गावात संघटित संस्था स्थापन करणे :-

भजनी मंडळे, तरूण मंडळे, महिला मंडळे , ग्रामविकास संस्था ह्या प्रकारच्या नेतृत्व निर्माण करणा-या संस्था गावात संघटित केल्या पाहिजेत. ह्यांच्या नेतृत्वातून भावी भरीव नेतृत्व तयार केले पाहिजे. या संस्था पुढे येण्यासाठी अशा संस्थांना आर्थिक मदत केली पाहिजे.

७.१.६ आदिवासी भागात उत्कृष्ट आदिवासी नेतृत्व निर्माण करणा-या अधिका-यांसाठी बक्षिस योजना :-

शासनाच्या विविध पातळीवर बरेच आदिवासी कर्मचारि व अधिकारी आदिवासी भागात कामे करतात. त्यांचा [illegible] संपर्क [illegible] अधिकारात

उत्कृष्ट आदिवासी नेतृत्व निर्माण करणा-या कर्मचा-यांचा / अधिका-यांचा आदिवासी सेवकांप्रमाणेच शासनाने सत्कार केला पाहिजे व त्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे /ज्यादा पगार वाढ दिली पाहिजे.

७.१.७ आदिवासी स्त्रियांमध्ये नेतृत्व निर्माण करणे :-

आदिवासी स्त्रियांमध्ये नेतृत्व नगण्यच आढळले. आदिवासी स्त्रियांच्या विकासासाठी आदिवासी स्त्रियांमधून नेतृत्व निर्माण केले पाहिजे व असे नेतृत्व भरभक्कम व बळकट कसे करता येईल याचा विचार केला पाहिजे. आदिवासी स्त्रियांचे बरेचसे विकासाचे प्रश्न त्यांच्या मार्फत सोडविता येतील. यासाठी आदिवासी स्त्रियांची अधिका अधिक महिला मंडळे स्थापन केली पाहिजेत.

७.१.८ आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेत वाढ:-

आदिवासींमध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण फारच नगण्य असल्याने त्यांच्यामध्ये नेतृत्व निर्माण होत नाही. त्यांसाठी स्त्री साक्षरतेकडे अधिक लक्ष देणे जरुरीचे वाटते.

७.१.९ आदिवासी नेत्यांमध्ये आत्मविश्वास उत्पन्न करणे :-

आदिवासी नेते प्रामाणिक आहेत परंतु अद्यापही ते आपले खरे व न्यायाचे प्रश्न मांडीत नाहीत. त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण केली पाहिजे. ही भावना काही प्रशिक्षणाव्दारे करता येईल का हयाचा विचार केला पाहिजे. अशा प्रकारे आदिवासी नेतृत्व बळकट होण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण उदयोन्मुख नेतृत्वाला दिले पाहिजे.

७.१.१० आदिवासी नेत्यांना प्रशिक्षण देणे :-

आदिवासी नेत्यांचा विकासाच्या, नियोजन, अंमलबजावणी व मूल्यमापन ह्या तिन्ही टप्प्यात सहभाग असणे जरुरीचे आहे. यासाठी आदिवासी नेत्यांना लोकशाही बाबत सविस्तर प्रशिक्षण दिले पाहिजे. या प्रशिक्षणामध्ये निवडणूक पध्दत, त्यांचे हक्क, त्यांच्या जबाबदा-या, कर्तव्ये व आदिवासी कल्याणकारी योजनांबाबत सविस्तर माहिती दिली पाहिजे.

७.१.११ नेत्यांना प्रचार साहित्य पुरविणे :-

आदिवासी नेत्यांना आदिवासींसाठी नियोजित योजनांची संपूर्ण माहिती देणारी पुस्तके व इतर साहित्य पुरविले पाहिजे. त्यासाठी प्रचार माध्यमाचा उपयोग करुन व्यापक स्वरुपात प्रसार केला पाहिजे. काही या बाबतच्या धडक योजनाही राबविल्या पाहिजे. म्हणजे त्यांचा उपयोग करुन नवीन योजनांचा प्रचार व प्रसार करता येईल.

७.१.१२. योग्य लाभार्थींच्या निवडीसाठी नेत्यांचा उपयोग :-

गावात कोणतीही नवीन योजना राबवितांना आदिवासी नेत्यांना विश्वासात घेऊन त्या गावातील योग्य लाभार्थींची निवड करण्यासाठी त्यांचा उपयोग करुन घेतला पाहिजे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

महाराष्ट्रातील सध आदिवासी नेतृत्व व त्यांचा विकासात सहभाग
सर्वेक्षण पाहणी १९८९

पत्रक नं. १
(आदिवासी सभासद/पदाधिकारी/नेत्यांसाठी)

चौक नं. १
सर्वसाधारण माहिती

अ.क्र.	बाब	
१.	आदिवासी नेत्याचे नाव	----------------
२.	त्याचे कायम राहण्याचे ठिकाण	----------------
	अ) गावाचे नाव	----------------
	ब) तालुका	----------------
	क) जिल्हा	----------------
३.	आदिवासी नेत्याच्या जमातीचे नाव	----------------
४.	आदिवासी नेत्याचे वय	----------------
५.	आदिवासी नेत्याचे शिक्षण	----------------
६.	त्याच्या कुटुंबातील एकूण माणसे	----------------
७.	त्याच्या कुटुंबातील कमावती माणसे	----------------
८.	कुटुंबाचा मुख्य व्यवसाय	----------------
९.	कुटुंबाचा दुय्यम व्यवसाय	----------------
१०.	कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आपल्यावर किती प्रमाणात आहे	होय/नाही
११.	आपले वार्षिक /मासिक उत्पन्न (रुपयांत)	-

१२) तुम्ही कोणत्या प्रकारचे सामाजिक कार्य करता ? — सामाजिक/शैक्षणिक/आरोग्य / शेती/ --- इतर

अ) सामाजिक कार्यासाठी दिवसातून किती वेळ आपण देऊ शकता ?

चौक नं. २

नेत्यांबाबत माहिती

१३) समाजसेवेचे काम आपणास स्वयंस्फुर्तीने करावेसे वाटते का? — होय/नाही

का ?

वाटत नसल्यास त्याची कारणे ---------------------------------

----

१४) तुमच्यावर लोकांनी होऊन नेतृत्व लादले आहे की? तुम्ही होऊन स्विकारले आहे? — होय/नाही

१५) आपण आदिवासी कोणत्या प्रकारच्या समाजसेवेच्या नेतृत्त्वाचे काम करता का? — १)---------------------------------

२)---------------------------------

----

१६) आपणास आदिवासींमध्ये कोणत्या प्रकारचे काम करण्यास आवडते ? — १) ---------------------------------

२) ---------------------------------

१७) तुमची या कामाबाबत काही राजकीय पार्श्वभूमी आहे का? ---------------------------------

----

१८) सध्या आपण कोणकोणत्या पदावर काम करता व केव्हापासून

पद	पासून/पर्यन्त
१.-	
२.-	

१९) पदावर येण्यासाठी लोकांचे सहकार्य कसे मिळाले? ------------------------------------

२०) तुम्हाला असलेल्या अधिकाराचा तुम्ही उपयोग कसा व कोठे केला ? ------------------------------------

२१) नेतृत्वाचे प्रशिक्षण आपण घेतले आहे का? ------------------------------------
असल्यास कोठे, केव्हा, किती कालावधीचे व कोणत्या बाबींवर उल्लेख करा . ------------------------------------

२२) आदिवासी नेतृत्व तुमच्या मते मजबूत करण्यासाठी कोणते प्रशिक्षण देणे आवश्यक आहे ? ------------------------------------

२३) भावी आदिवासी नेतृत्व भरभक्कम करण्यासाठी काय उपाय योजावेत असे तुम्हाला वाटते. ------------------------------------

चौक नं. ३

आदिवासी योजनांतील नेत्यांचा सहभाग

२४) आदिवासी कल्याणाच्या योजनांची कार्यवाही चांगल्या रितीने व्हावी यासाठी काय उपाययोजनेत असे तुम्हाला वाटते ? ------------------------------------

२५) आदिवासी हिताच्या योजनांची कार्यवाही करण्यासाठी आपल्या नेतृत्वाचा कसा उपयोग करता येईल? गेल्या वर्षभरात त्याचा कसा उपयोग झाला ? ______________________

२६) योजना मंजूर करताना आपल्या सूचनांचा विचार केला जातो का? होय/नाही

कोणत्या सूचना आपण मांडल्या? ______________________

कोणत्या मान्य झाल्या नाहीत ? ______________________

२७) अ) मागील वर्षाच्या मंजूर योजनांपैकी तुम्ही किती योजना स्वत: समजावून घेतल्या ? ______________________

ब) किती लोकांना समजावून सांगितल्या ______________________

क) सरकारी अधिकाऱ्यामार्फत लोकांना किती योजना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला ? ______________________

२८) इतर आदिवासी सभासदांकडून योजना राबविताना मदत झाली काय ? कोणती ? कशी ? ______________________

२९) आदिवासी लोकांचा योजनेमध्ये सहभाग आढळला काय? कसा? ______________________

३०) आदिवासी हिताच्या योजना राबविताना आदिवासी लोकांचे सहकार्य कसे मिळते ? (उदाहरण देऊन स्पष्ट सांगा) — चांगले/मध्यम/सहकार्य नाही.

३१) बिगर आदिवासी लोकांचे सहकार्य तुम्हाला कसे मिळते ? — चांगले/मध्यम/मिळत नाही.

३२) आदिवासींच्या योजना बिगर आदिवासींनी मांडल्या आहेत का ? कोणत्या ?

३३) बिगर आदिवासी आदिवासींच्या चर्चेत भाग घेतात का ?

३४) तुम्हाला आदिवासी विकासाच्या योजना राबवितांना कोणत्या प्रमुख अडचणी येतात ?

३४)अ) त्या आपण कशा सोडविण्याचा प्रयत्न करता ? उदाहरण द्यावे

३५) योजना राबविण्यासाठी आपणास काही अधिकार असावेत असे वाटते का ? असल्यास कोणते ? — होय/नाही

अ) आपणांस कोणत्या प्रकारचे अधिकार दिल्यास काम सुकर होण्याचा संभव आहे ?

३६) तुमच्या मते आदिवासी योजना तळागाळातील लोकांपर्यन्त पोहचतात का ? — होय/नाही

अ) पोहोचत नसतील तर त्या पोहोच- ण्यासाठी तुमचा सहभाग कसा असावा ? ----------

३७) आदिवासी योजना अतिदुर्गम भागात पोहोचतात का ? होय/नाही

अ) असल्यास त्याची कारणे व तुमचा यासाठी कसा सहभाग घेता येईल?
१) ----------
२) ----------
३) ----------

३८) आदिवासी योजना अपयशी का ठरतात त्याची प्रमुख कारणे कोणती?
१) ----------
२) ----------
३) ----------

३९) योजना योग्य त-हेने राबविली जाते की नाही ह्यावर आपण देखरेख ठेवता का ? होय/नाही

४०) योजना पूर्ण झाल्यावर त्याची व्यवस्था आपण पाहता का? होय/नाही
होय असल्यास उदाहरणे द्यावीत. ----------
नाही असल्यास कारणे द्यावीत. ----------

४१) तुम्ही गावांत कोणकोणत्या योजना राबविल्या आहेत?
१) ----------
२) ----------
३) ----------

४२)

४२) शासकीयअधिका-यांनी आदिवासीं- साठी स्वत:हून काही योजना राबवि त्या आहेत का ? नावे द्या. तुमचा सहभाग त्यात का नाही ?
१) ----------
२) ----------
३) ----------

४३) इतर विशेष बाबी असल्यास ------------------------------
खुलासा करावा. ------------------------------

चौक नं. ४

जवाहर योजनेची अंमलबजावणी व मते

४४) १९८९-९० वर्षासाठी ग्रामपंचायतीला ------------------------------
जवाहर योजनेखाली किती रक्कम
मंजूर झाली ?

४५) या योजनेखाली मिळणा-या रकमेचे ------------------------------
ग्रामपंचायतीने कसे नियोजन केलेले
आहे.

अ.क्र.	बाब	तरतूद	भौतिक लक्ष
१.			
२.			
३.			
४.			
५.			

स्त्रीयांचे ग्रामपंचायतीत ३० ते ३५% ------------------------------
आरक्षण योग्य वाटते का? तुमचे याबाब------------------------------
याबाबत मत काय आहे? ------------------------------

ग्रामपंचायतीला न्यायनिवाडा किरकोळ ------------------------------
दंड इत्यादि बाबतचे किंवा इतर ------------------------------
कोणते अधिकार द्यावेत असे तुम्हाला ------------------------------
वाटते? ------------------------------

पारंपारिक पंचायतीचे काम थोड्या ------------------------------
फार फरकाने ग्रामपंचायतीला द्यावे ------------------------------
असे तुम्हाला वाटते का ? ------------------------------

पंचायत राज विधेयकाबाबत तुमचे ------------------------------
सर्व साधारण काय मत आहे? ------------------------------